PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Anumati
Year: 2013

Song: Shravan masi ga sanasudi
Lyricist: Gajendra Ahire

हे श्रावणमासी गं सणासुदी
सखू चालल्या माहेरासी
सखूच्या मनी गं मोर नाचतो
सखू चालल्या माहेरासी

आली लंघून उंबरा
माझं घर दोन खणी
काय ऐवज दिला मी
काळी पोत दोन मणी

ए सखू नांदायाला गेली
जड पावलांची झाली
तेज सूर्याचं वटीत
तीच्या गालावर लाली

सारं कसं नीट होत गेलं

श्रीकांत झाला मग माऊ झाली
माझा बुटका पगार तुझी उंच गुढी
निभावलंस सारं
सारं थोडं थोडं होतं
पण कधी कमी जाणवलं नाही
तुझी घागर कायम भरलेली
माझ्या जुन्या शर्टाला बटनं लावत लावत
माझा संसार शिवलास माणसं विणलीस

हे आखाड गेला
श्रावण भादवा ही गेला
सखूची माया साऱ्या ऋतूमंदी
सखू तुझ्या मुखी गं देव बोलतो
तुझ्या अंगी माया श्रीरंगाची

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*